# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Fax.२२६६१२३९ Tel.२२६६५२३३, Email: collector_mumbaicity@maharashtra.gov.in
(महसूल शाखा)

क्रं.सीएसएलआर/आरईव्ही-१-२/संकीर्ण/समारंभ/परवानगी/पथक/२०१७
दिनांक ऑगस्ट, २०१७
09 AUG 2017

विषय :- जनहित याचिका क्र.१७३/२०१०
डॉ.महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर
ध्वनी प्रदुषण नियमांची अंमलबजावणी करण्याबाबत

संदर्भ :- १. उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांचेकडील पत्र दि.८/८/२०१७
२. मा.जिल्हाधिकारी यांचे दालनामध्ये झालेली सभा दि.९/८/२०१७

**आदेश :-**

उपरोक्त विषयांकीत प्रकराणी संनियंत्रण समिती क्र. २ अंतर्गत येणारे पथक क्र. १ मधिल गट प्रमुख श्री. विनोद गोसावी (तहसिलदार), संजय गांधी निराधार योजना शाखा यांची नेमणूक "सी" वार्ड करीता करणेत आलेली आहे. तसेच संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये श्री. विनोद गोसावी (तहसिलदार) यांची मीरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती झालेली असल्यामुळे त्यांच्या ऐवजी अन्य तहसिलदार यांची नेमणूक करणेबाबत सभेमध्ये विनंती करण्यात आलेली असून संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

तसेच संनियंत्रण समिती क्र. ३ अंतर्गत येणारे पथक क्र. २ मधिल गट प्रमुख श्री. दयालसिंग ठाकूर तहसिलदार, (अति./निष्का.) धारावी विभाग यांची नेमणुक मंडप तपासणी पथकामध्ये गट प्रमुख पदी "जी/नॉर्थ" वार्ड विभागाकरीता करणेत आलेली असून त्यांचीसुध्दा महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती झालेली असल्यामुळे त्यांच्या ऐवजी अन्य तहसिलदार यांची नेमणूक करणेबाबत सभेमध्ये सुचित केलेले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने त्यांचेकडील परीपत्रक क्र. याचिका २०१५/सं.क्र.८७८(१)/ नवी-३४, दिनांक ०६/०७/२०१५ मधील मुद्दा क्र. ६ नुसार "जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रात तहसिलदार दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्यांचा गट नियुक्त करावयाचा आहे." सदर शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने तसेच उपरोक्त अडचण विचारात घेता संदर्भ क्र. २ च्या सभेमध्ये ठरल्याप्रमाणे या कार्यालयामध्ये तहसिलदार संवर्गातील अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे सदर पदी माननियांच्या निर्देशानुसार नायब तहसिलदार यांची नियुक्ती संबंधित तहसिलदार यांच्या निवडणूक कालावधीपर्यंत खालील प्रमाणे करणेत येत आहे. मात्र

निवडणूक कालावधीनंतर मुळ आदेशानुसार कामकाज पाहण्यात यावे. तसेच आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना सुध्दा याबाबत कळविण्यात यावे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

| पुर्वीच्या अधिकाऱ्याचे नाव व पद | प्रतिनियुक्ती केलेल्या अधिकाऱ्याचे नाव व पद | वार्ड |
|---|---|---|
| श्री. विनोद गोसावी (तहसिलदार), संजय गांधी निराधार योजना शाखा | श्री. किशोर जाधव (ना. तहसिलदार), सामान्य प्रशासन शाखा | "सी" वार्ड |
| श्री. दयालसिंग ठाकूर तहसिलदार, (अति./निष्का.) धारावी विभाग | श्रीम.तनुजा वडनेरे (ना. तहसिलदार), करमणूक कर शाखा | "जी/नॉर्थ" वार्ड |

उपरोक्त प्रमाणे मंडप तपासणी पथकांमध्ये महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ च्या कालावधीकरीता बदल करणेत येत असून संबंधितांनी नोंद घ्यावी व आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

(--स्वा--)
जिल्हाधिकारी, मुंबई शहर

प्रत.-

१. श्रीमती पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी, (सामान्य प्रशासन विभाग), संनियंत्रन समिती क्र. २
२. श्रीमती अंजली भोसले, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) धारावी विभाग, संनियंत्रन समिती क्र. ३
३. श्री. विनोद गोसावी तहसिलदार, संजय गांधी निराधार योजना शाखा, मुंबई शहर
४. श्री. दयालसिंग ठाकूर तहसिलदार, (अति./निष्का.) धारावी विभाग, मुंबई शहर
५. श्री. राजेश ढोले, विभाग कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, संनियंत्रन समिती क्र. २
६. श्री. विनोद सावंत, सहा.पोलीस आयुक्त सी – वार्ड (पायधुनी), संनियंत्रन समिती क्र. २
७. श्री. शिरीष सावंत, सहा.पोलीस आयुक्त डी – वार्ड, (गांवदेवी), संनियंत्रन समिती क्र. २
८. श्री. सुहास रायकर, सहा.पोलीस आयुक्त जी/साऊथ वार्ड, (वरळी), संनियंत्रन समिती क्र. २
९. श्री. अनिल परमार , विभाग कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, संनियंत्रन समिती क्र. ३
१०. श्रीम. अमिता भोसले, सहा.पोलीस आयुक्त एफ/नॉर्थ – वार्ड, (माटुंगा), संनियंत्रन समिती क्र. ३
११. श्री. शिलवंत ढवळे, सहा.पोलीस आयुक्त जी/नॉर्थ – वार्ड, (माहिम), संनियंत्रन समिती क्र. ३
१२. श्री. दिनेश जोशी, सहा.पोलीस आयुक्त एफ/साऊथ वार्ड, (भोईवाडा), संनियंत्रन समिती क्र. ३
१३. श्री. किशोर जाधव (ना. तहसिलदार), सामान्य प्रशासन शाखा, मुंबई शहर यांना कार्यवाहीस.
१४. श्रीम.तनुजा वडनेरे (ना. तहसिलदार), करमणूक कर शाखा, मुंबई शहर यांना कार्यवाहीस.

(चंद्रकांत थोरात)
निवासी उपजिल्हाधिकारी,
मुंबई शहर